सारी फुले एकदम कधीच फुलत नाहीत.
मात्र केव्हातरी फुलल्याशिवाय राहत नाहीत.
मुलांचेही असेच असते, फुलतातच ती केव्हातरी.

मुलांच्या फुलण्याबाबत आपण आशावादी असावे,
जमल्यास मुलांना फुलता येण्याचे भान द्यावे.
नुसतेच फुलणे हेच यश असते, हे सांगावे.

फुला-मुलांच्या फुलण्यातली नैसर्गिकता अनुभवावी
त्यांच्या फुलण्यातली सुंदरता त्यांना दिसू द्यावी.
फुलण्याबरोबर येणारा सुगंध हीच यशाची गाथा गावी.

३.१.२०१९